लोकमत पु. पान क्र. 3

# तिल्हेरच्या जंगलातील हातभट्ट्या केल्या उद्ध्वस्त

लोकमत न्यूज नेटवर्क

पारोळ : वसई पूर्व भागातील तिल्हेर येथील जंगलात गावठी दारू बनवणाऱ्या हातभट्ट्यांवर मांडवी पोलिसांनी कारवाई करून अनेक हातभट्ट्या उद्ध्वस्त केल्या. तसेच दारू बनवण्यासाठी लागणारा अडीच लाखांचा मुद्देमाल पोलिसांनी नष्ट केला असून एका आरोपीस ताब्यात घेतले आहे. गुप्त माहितीच्या आधारे पोलिसांनी ही कारवाई केली तर ही मोहीम आणखी तीव्र करणार असल्याचे मांडवी पोलिस निरीक्षक प्रकाश कावळे यांनी सांगितले.

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था राखण्यात यावी, यासाठी गावठी दारू बनवणाऱ्या हातभट्ट्यांवर वसई विरार मिरा भाईंदर पोलिस आयुक्तालयाने कारवाईची मोहीम हाती घेतली आहे. यात वसईत या आठवड्यात अनेक ठिकाणी गावठी दारू बनवणाऱ्या हातभट्ट्यांवर कारवाई करून लाखोंचा मुद्देमाल नष्ट केला आहे.



तिल्हेर येथील जंगलामध्ये जाऊन कारवाई करण्यासाठी पोलिसांना पायी एक दीड तास अंतर कापून जावे लागते. परिणामी ही कारवाईची खबर लागताच अनेक आरोपी घटनास्थळावरून फरार झाले. पोलिस शोध घेत आहेत.

# वाहनाची धडक; एकाचा मृत्यू

लोकमत न्यूज नेटवर्क

मीरा रोड : काशिगाव पोलिस ठाणे हद्दीत मुंबई-गुजरात महामार्गावर घोडबंदर गावाजवळ रात्रीच्या सुमारास राज अनिल पाटील यांना अनोळखी वाहनाने जबर ठोकर दिली. त्या धडकेत पाटील यांच्या डोक्याला तसेच हातापायाला गंभीर दुखापत झाली. त्यात त्यांचा मृत्यू झाला. या प्रकरणी काशिगाव पोलिसांनी अनोळखी वाहनचालकाविरुद्ध १५ नोव्हेंबर रोजी गुन्हा दाखल केला आहे. महिला पोलिस उपनिरीक्षक बोरकर या अधिक तपास करत आहेत.

# बनावट खाते उघडून अश्लील छायाचित्रे व्हायरल

लोकमत न्यूज नेटवर्क

मीरा रोड : काशिगाव पोलिस ठाणे हद्दीत राहणाऱ्या एका तरुणीच्या नावाने बनावट इंस्टाग्राम आयडी बनवून त्यावर तरुणीची छायाचित्रे आणि अश्लील छायाचित्रे अपलोड केली गेली. तसेच अश्लील संदेश पाठवले गेले. तरुणीच्या बदनामीसह तिच्या मनास लज्जा होईल असे कृत्य केल्याप्रकरणी काशिगाव पोलिसांनी अनोळखी व्यक्तीविरुद्ध विनयभंगासह आयटी ॲक्टनुसार १५ नोव्हेंबर रोजी गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणी पोलिस निरीक्षक तोगरवाड हे तपास करत आहेत.

# बॅट लागून महिला जखमी

मीरा रोड : मीरा रोडच्या कनकिया या भागातील लल्लन तिवारी कॉलेज समोरील बस स्टॉप येथे रुणादेवी श्रवण चौधरी या उभ्या होत्या. त्यावेळी तेथे प्रिन्स संजय गुप्ता यांनी क्रिकेटचा चेंडू कृष्णा दुबेच्या दिशेने फेकला. चेंडू मारण्यासाठी कृष्णा दुबे यांनी जोरात बॅट फिरवली असता ती बॅट रुणादेवी यांच्या डोक्याला लागून त्या गंभीर जखमी झाल्या. याप्रकरणी १५ नोव्हेंबर रोजी मीरा रोड पोलिसांनी कृष्णा दुबे व प्रिन्स गुप्ता या दोघांवर गुन्हा दाखल केला आहे.

CamScanner
Scanned with OKEN Scanner

लोकमत पान क्र. 2

# ५१ लाख ७० हजारांच्या बनावट नोटा जप्त

लोकमत न्यूज नेटवर्क

मीरा रोड : निवडणुकीची रणधुमाळी शिगेला पोहोचली असताना गुजरातवरून मीरा रोडला आलेल्या तरुणाकडे ५१ लाख ७० हजार रुपयांच्या बनावट नोटा सापडल्या आहेत. त्याला अटक करण्यात आली आहे.

मीरा-भाईंदर वसई-विरार पोलिस आयुक्तालयाच्या मध्यवर्ती गुन्हे शाखेच्या पथकाने मिळालेल्या माहितीच्या आधारे १५ नोव्हेंबरला मीरारोडच्या प्लेझंट पार्क ते मुन्शी कम्पाउंडकडे जाणाऱ्या रस्त्यावर डॉन आर्यन मनसुखभाई जाबूचा (१९, रा. सरिता सोसायटी, स्ट्रीट क्रमांक ५, भावनगर, गुजरात) याला ताब्यात घेतले. त्याच्याकडील बॅगेत ५०० रुपयांच्या १०,३५२ बनावट नोटांची ५३ बंडले सापडली. या ५१ लाख ७० हजार रुपये किमतीच्या बनावट नोटांसह त्याच्याकडील दोन मोबाइल फोनही जप्त केले आहेत. त्याच्यावर काशीमीरा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### हेतू काय?

या बनावट नोटा आरोपीने बाजारात वितरित करण्यासाठी आणल्या असाव्यात, असा कयास आहे. मोठमोठी रोखड जप्त केली जात असताना गुजरातवरून मोठ्या रकमेच्या बनावट नोटा आणल्या गेल्याने त्याचा निवडणुकीशी संबंध असल्याचा संशय व्यक्त होत आहे.

पुण्यनगरी पृ. पान क्र. 4

# सरकारच्या योजनांमुळे देश जाणार अग्रस्थानी

## ■ संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांचे प्रतिपादन

**■ विरार :** निवडणूक प्रचारासाठी महाराष्ट्राच्या भूमीवर प्रचार दौऱ्यावर असलेले देशाचे संरक्षण मंत्री राजनाथ सिंह आणि गुजरातचे गृहमंत्री हर्ष सिंघवी यांनी मतदारांना भारतीय जनता पक्षाला मतदान करून राजन नाईक यांना विजयी करण्याचे आवाहन केले. सरकारच्या योजना देशाला अग्रस्थानी घेऊन जातील, असेही त्यांनी सांगितले.

भारतीय जनता पक्षाचे उमेदवार राजन नाईक नालासोपारा भागातून निवडणूक लढवत आहेत. त्यांच्या प्रचारसभेत बोलताना राजनाथ सिंह भाषणात म्हणाले की, सरकारच्या योजना भारताला टॉप तीन देशांमध्ये घेऊन जाणार आहेत, ज्यामध्ये अमेरिका आणि चीननंतर भारताचा क्रमांक असेल. भाजपजे काही म्हणेल ते करतो. आमच्या सरकारने २५ कोटी लोकांना गरिबीतून मुक्त केले आहे. लाखो लोकांना घरे दिली आहेत. एक कोटी महिला करोडपती झाल्या आहेत. ३ कोटी महिलांना करोडपती बनवण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे. ज्या कुटुंबांचे वार्षिक उत्पन्न अडीच लाख रुपये आहे, त्यांना आयुष्मान योजनेंतर्गत मोफत उपचार देण्यात आले आहेत. पालघर जिल्ह्यात भारतातील सर्वात मोठे बंदर बांधण्याचे काम सुरू आहे. या बंदराच्या निर्मितीमुळे पालघर जिल्ह्यात रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होणार आहेत. राजनाथ सिंह यांच्यानंतर गुजरातचे गृहमंत्री हर्ष सिंघवी यांनीही महाआघाडीवर टीकास्त्र सोडले.

महाराष्ट्र सुरक्षित हातात आहे आणि राहील, असे सांगून ते म्हणाले की, राजन नाईक हे मेहनती, तरुण आणि मनमिळाऊ नेते आहेत. त्यांना संधी द्या. ते नालासोपाऱ्याचे रुप बदलून टाकतील. सभा संपल्यानंतर हर्ष सिंघवी यांनी राजन नाईक यांच्या बाईक रॅलीत सामील होऊन जनतेकडून भाजपसाठी आशीर्वाद मागितले.

CS CamScanner

Scanned with OKEN Scanner

पुढारी पान क्र. 2

# मारण्याची धमकी देणाऱ्यांना १० वर्षे सश्रम कारावस

**भाईंदर : पुढारी वृत्तसेवा**

कॉंग्रेसचे माजी नगरसेवक जुबेर इनामदार यांनी त्यांच्या प्रभागातील काही मद्यपी तरुण रस्त्यावरच दुचाकी अवास्तव पार्क करून लोकांना त्रास देत असल्याची तक्रार २०१८ मध्ये नयानगर पोलीस ठाण्यात केली होती. त्याचा राग मनात धरून मद्यपी युनेब नासीर केवल (२०) व आसीफ अन्वर खान (२२) यांनी ३ फेब्रुवारी २०१८ रोजी जुबेर यांच्या दोन मुलींना जीवे ठार मारण्याच्या उद्देशाने घराच्या दरवाजाला आग लावली. याप्रकरणी नयानगर पोलिसांनी संबंधित आरोपींना अटक केली होती. यावर १३ नोव्हेंबर रोजी पार पडलेल्या अंतिम सुनावणीत न्या. जी. जी. भन्साळी यांनी आरोपींना १० वर्षांच्या सश्रम करावासासह ३ हजार रुपये आर्थिक दंडाची शिक्षा सुनावली. जुबेर इनामदार हे नशामुक्ती संदर्भात नयानगर परीसरातील इ मारतींमध्ये बैठका घेवून जनजागृती करतात. २०१८ मध्ये त्यांनी नयानगर परिसरातील अल शम्स मस्जीदच्या मागील रस्त्यावर काही मद्यपी तरुण दुचाकी अवास्तव पार्क करून लोकांना त्रास देत होते. याप्रकरणी जुबेर यांनी परिसरातील रहिवाशांची स्थानिक पोलीसांसोबत बैठक आयोजित करून त्रासदायक ठरणाऱ्या मद्यपी तरुणांविरोधात नयानगर पोलीस ठाण्यात तक्रार केली होती. त्याचा राग मनात धरून परिसरातच राहणारे मद्यपी युनेब नासीर केवल व आसीफ अन्वर खान यांनी संगनमत करून ३ फेब्रुवारी २०१८ रोजी मध्यरात्रीच्या सुमारास जुबेर घरी नसताना तसेच घरात त्यांच्या मुली या दोघीच असताना त्यांना जीवे ठार मारण्याच्या उद्देशाने जुबेर यांच्या घर बाहेरुन बंद करत पेट्रोल दरवाजावर टाकून त्याला आग लावली. घराला आग लागल्याची बाब रुफी व सिदरा यांच्या वेळीच लक्षात आल्याने त्यांनी आरओरड करण्यास सुरुवात केली. यामुळे इमारतीतील शेजाऱ्यांनी धाव घेत जुबेर यांच्या घराच्या दरवाजाला लागलेली आग विझविली. याप्रकरणी रुफी हिने नयानगर पोलीस ठाण्यात तक्रार केली. आरोपींना अटक करून १ मे २०१८ रोजी जिल्हा न्यायालयात दोघांवर दोषारोप मादर केले. त्यावरील अंतिम सुनावणी १३ नोव्हेंबर रोजी पार पडली असता न्यायालयाने आर-ोपींना १० वर्षे सश्रम कारावास व प्रत्येकी ३ हजार रुपये आर्थिक दंडाची शिक्षा सुनावली आहे.

पुढारी पान क्र. 6

# विकासकामांचा पाढा वाचत आ. हितेंद्र ठाकुरांनी विरोधीपक्षांना दिली सणसणीत उत्तरे

## वीज आणि पाणी प्रश्नापासून वसई-विरार शहर मुक्त!

**नालासोपारा : पुढारी वृत्तसेवा**

विधानसभा निवडणुका जश्या जवळ येऊ लागल्या आहेत तसे राजकीय पक्षांकडून एकमेकांवर आरोप प्रत्यारोप केले जात आहेत. कुणावरही टीका करण्यापेक्षा आपण केलेल्या कामांवर आणि विकासावर आपण बोलले पाहिजे, असं मत कायम व्यक्त करणाऱ्या आमदार हितेंद्र ठाकूर यांनी आपण केलेल्या विकासकामांची माहिती वसई विरार मध्ये झालेल्या प्रचार दौऱ्यात दिली. यामुळे विरोधकांकडून केल्या अपप्रचाराला त्यांनी सणसणीत उत्तरं देत विकासकामांचा पाढाच यावेळी वाचला.

तसेच रोजगार निर्मिती, उद्योगधंदे आणि व्यापारउदीम वाढावा, यासाठी आम्ही तीघे आमदार यांनाते शासकीय आणि निमशासकीय यंत्रणांद्वारे कायमच प्रयत्न करत आलो आहोत. शहरातील अंतर्गत वाहतूक सुधारावी तसेच मुंबईशी वसई-विरार जोडले जावे, यासाठी नायगाव ते भाईंदर या दरम्यान पूल बांधणे, ज्यामुळे वाहन प्रवास अधिक सुलभ होईल. यासोबतच विरार पर्यंत मेट्रो आणावी अशी मागणी सुद्धा ठाकूर सातत्याने करत आहेत. आणि ती मान्यही झाली आहे. वसई-विरार- नालासोपारा या शहरांना जोडणारा रिंगरोड प्रस्तावित आहे, तो ही मंजूर झाला आहे. शहरात नव्याने होणारे ७ उड्डाणपूल, भविष्यातील रिंगरोड तसेच मेट्रोचीही मागणी आपण केलेली आहे अशी माहिती यावेळी हितेंद्र ठाकुरांनी दिली.

### कामण आणि चिखंडोंगरी येथे होणाऱ्या सबस्टेशमुळे वीज प्रश्न सोडवण्यास मदत

१८०० करोड महावितरणला देण्यात आलेले असून जिथे पावसामुळे तसेच हवेमुळे केबल तुटण्याच्या घटना घडतात अशा ठिकाणी भूमिगत केबल्स टाकण्यासाठी १८७ करोड मंजूर करून घेण्यात आले आहेत अशीही माहिती यावेळी ठाकुरांनी दिली. त्यामुळे वसई विरार परिसराच्या वीज प्रश्नांवर मोठ्या प्रमाणावर काम होऊन वीज प्रश्न सोडवण्यास मदत होणार आहे. वसई विरार शहरातील पाणीप्रश्न सोडविण्यासाठी सतत प्रयत्नशील असणाऱ्या ठाकुरांनी यावेळी आणखीन काही योजना लवकरच मार्गी लागणार असल्याचे सांगितले. दहेरजा नदीवरील प्रस्तावित पाणीपुरवठा योजनेसाठी १६५ करोड तसेच सुसरी धरणाच्या योजनेसाठी १६ करोड रुपये वसई विरार शहर महानगरपालिकेने जलसंपदा विभागाकडे जमा केले आहेत असेही ते म्हणाले.

नालासोपारा शहरातील वाहतूक कोंडीच्या समस्येविषयी देखील ते बोलले. नालासोपाऱ्यात सध्याच्या घडीला एकच उड्डाणपूल असल्याने तिथे वाहतूक कोंडीचा प्रश्न निर्माण होतो तो प्रश्न सोडवण्यासाठी लवकरच दुसरा उड्डाणपूल उभारला जाणार आहे. तसेच विरार पश्चिमेच्या बोळींज येथे होणाऱ्या वाहतूक कोंडीचा प्रश्नही मार्गी लागणार असल्याचे त्यांनी सांगितले. यासाठी विरार पश्चिमेच्या सायन्स गार्डन पासून ते बोळींजपर्यंत फ्लायओव्हर उभारण्यात येणार आहे त्यामुळे प्रवासासाठी लागणाऱ्या वेळेची बचत होणार आहे.

CamScanner
Scanned with OKEN Scanner

N.B.T. पान क्र. 5

## नशा मुक्ति केंद्र में युवक ने लगाई फांसी

■ निसं, विरार: मांडवी पुलिस स्टेशन क्षेत्र के अंतर्गत तिलहेर गांव के पास स्थित एक नशा मुक्ति केंद्र में 20 वर्षीय युवक ने फांसी लगाकर ख़ुदकुशी कर ली। जानकारी के अनुसार, तिलहेर गांव में सुप्रभात फाउंडेशन द्वारा नशामुक्ति केंद्र संचालित किया जाता है। संचालक अर्पित अरविंद चड्ढा (48) ने बताया कि उनके नशा मुक्ति केंद्र में धारावी निवासी विक्रम तमिलन (20) उपचार के लिए ऐडमिट हुआ था। गुरुवार की देर रात उसने बाथरूम की खिड़की पर रस्सी से फांसी लगाकर आत्महत्या कर लिया।

## लिव इन पार्टनर पर बलात्कार का आरोप

■ निसं, वसई: मधुबन इलाके में लिव रिलेशनशिप में रहने वाली 35 वर्षीय महिला ने अपने पार्टनर पर बलात्कार का आरोप लगाया है। महिला की शिकायत पर वालीव पुलिस स्टेशन में विभिन्न धाराओं के तहत केस दर्ज किया गया है। महिला ने आरोप लगाया कि 38 वर्षीय शख्स शादी करने का झांसा देकर लिव इन रिलेशनशिप में रहने लगा। उसने दो बार शारिरक संबंध बनाए और 60 हज़ार नकद व 40 हजार की जूलरी भी चोरी कर ली।


AI Image

दै. भास्कर पान क्र.3

## देशी पिस्टल के साथ दबोचा गया आरोपी



भास्कर संवाददाता | वसई.

वसई-विरार में हथियार की तस्करी करनेवाले एक अपराधी को पेल्हार पुलिस ने गिरफ्तार लिया है। पुलिस ने आरोपी के पास से एक देशी पिस्टल और तीन करतूत बरामद किया है। आरोपी की पहचान अशरफ अब्दुलसलाम अंसारी के रूप में हुई है। पुलिस ने बताया कि विधानसभा चुनाव चल रहा है। पुलिस को सूचना मिली कि एक आरोपी पेल्हार पुलिस स्टेशन के अंतर्गत हथियार की सप्लाई करने आया है। डिटेक्शन ब्रांच की टीम ने जाल बिछाकर आरोपी को धानीव गांव से गिरफ्तार कर लिया। पुलिस ने आरोपी के खिलाफ आर्म एक्ट सहित विभिन्न धाराओं के तहत मामला दर्ज किया है।

नवभारत पु. पान क्र. 3

## वसई में जनसभा को संबोधित करेंगे खड़गे

**वसई, (सं).** आगामी 20 नवंबर को होना है. इसके चुनाव प्रचार का दौर सोमवार की शाम बंद हो जाएगा. इसके पूर्व सभी पार्टियां अपने उम्मीदवारों को जीत दिलाने के लिए हर हथकंडे अपना रही है. इसी क्रम में महाविकास आघाडी से वसई विधानसभा सीट पर भारतीय राष्ट्रीय कांग्रेस पार्टी की टिकट पर चुनाव मैदान में उतरे विजय गोविन्द पाटिल व नालासोपारा सीट से चुनाव लड़ रहे प्रत्याशी संदीप पाण्डेय के प्रचार को लेकर वसई पश्चिम के मानिकपुर स्थित वाईएमसी मैदान में सोमवार को एक विशाल जनसभा आयोजित की जाने वाली है. इस सभा को सम्बोधित करने के लिए भारतीय राष्ट्रीय कांग्रेस के राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खड़गे, कर्नाटक के ऊर्जामंत्री ए जे. जॉर्ज, महाराष्ट्र प्रभारी चेन्निथला सहित महाराष्ट्र राज्य के कर वरिष्ठ पदाधिकारी उपस्थित होंगे. यह जानकारी वसई पश्चिम के पारनाका स्थित वसई विरार कांग्रेस कार्यालय में आयोजित पत्रकार वार्ता के दौरान जिलाध्यक्ष ओनिल अल्मोड़ा ने दी है.



CamScanner

Scanned with OKEN Scanner

The Free Press Journal

# Gym trainer robbed of ₹13 lakh at knifepoint

**Suresh Golani**
MIRA BHAYANDAR

A 26-year-old gym trainer who also deals in cryptocurrency trading was allegedly robbed of Rs13.5 lakh by an eight-member gang, including six bike-borne men, in Mira Road.

An offence under sections 310 (2) for dacoity and 311 (2) for robbery/dacoity with attempt to cause death or grievous hurt of the Bharatiya Nyaya Sanhita (BNS) was registered against the accused at the Mira Road police station last Wednesday.

In his statement to the police, Aniket Singh, 26, said that he required USDT (United States Department of the Treasury) cryptocurrency for which he came into contact with a person identified as Afaan through a common acquaintance. Afaan claimed that he possessed 56,443 USDT, which he wanted to sell at Rs81 per unit. As decided, Afaan along with his colleague came to Mira Road in a car.

Singh accompanied them and stopped near the SK Stone signal in Mira Road where he handed over the cash to Afaan. As he was counting the notes, six masked men on three bikes suddenly appeared near the car and threatened the occupants before fleeing with the money.

As Singh stepped out to chase the bikers, Afaan and his colleague allegedly started the car and fled the spot. Although the police did not divulge any details, three people have been taken into custody for their suspected involvement in the crime, sources said. Further investigations were underway.

# Three-time MLA Pratap Sarnaik touts report card

**Suresh Golani**
MIRA-BHAYANDAR

Eyeing a straight fourth term, Mahayuti candidate and sitting MLA Pratap Sarnaik from Ovala-Majiwada unveiled his manifesto-cum-report card in the presence of national BJP president J P Nadda on Saturday.

Titled "Promised-Completed", the document not only showcases the developmental works completed by Sarnaik during his 15-year stint, but also throws light on the future roadmap planned by him.

Some of the key promises include commissioning of the 218 MLD Surya water project, well-equipped 500-bed cashless hospital, a large animal museum replicating those in Hong Kong and Singapore, addition of e-buses and setting up of EV charging stations, among others. Sarnaik's other grand plans include facilitating halts for long-distance trains at the Mira Road and Bhayandar stations, internal Metro line in Thane city and a ropeway service in the Mumbai Metropolitan Region like those operating in Bengaluru.

In the report card, Sarnaik touted the works done by him, which include construction of cement concrete roads, auditorium, conservation and beautification of the historic Ghodbunder fort. He also took the credit for the revival of old wells, building a hostel for tribal students and widening the stretch of road between Gaimukh and Fountain Hotel.

Scanned with OKEN Scanner